# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ३६ दिनांक २६/०२/२०२१

## १,०९,०४६/- रुपये किंमतीची देशी-विदेशी दारु बेकायदेशिर रित्या वाहतुक करणा-या वाहनावर गुन्हे शाखा, कक्ष-३. विरार यांची कारवाई

दिनांक २५/०२/२०२१ रोजी गुन्हे शाखा-३ विरार चे पो.नि/प्रमोद बडाख व पथक तुळींज पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना बातमीदाराकडुन “ एक सफेद रंगाच्या टाटा कंपनीचा टाटा एस टेम्पो क्रमांक एम.एच.४८ जि. २१२८ मधुन दोन इमस हे नालासोपारा पुर्व एव्हरशाईन ब्रॉडवे च्या सर्कल वरुन विदेशी दारुची वाहतुक करणार आहे.” अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सापळा रचुन नमुद टेम्पो क्रमांक एम.एच.४८ जि. २१२८ ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्यामध्ये १,०९,०४६ /- रु किंमतीची देशी व विदेशी मद्य बेकायदेशीररित्या बाळगुन मिळुन आल्याने सदरचा टेम्पो व देशी विदेशी दारु असा एकुण ५,०९,०४६/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन नमुद टेम्पो चालक वय-५० वर्षे, व त्याचे सोबत असलेला इसम वय-४५ वर्षे यांना ताब्यात घेवुन त्यांच्या विरुध्द तुळींज पो.स्टे. येथे महाराष्ट्र पोलीस कायदा ६५(ई) प्रमाणे गुन्हा नोंद करुण कारवाई करण्यात आली आहे.

वरील कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष -३ विरार चे पो.नि/प्रमोद बडाख, पो.उपनिरी/ शिवाजी खाडे, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना/ प्रदीप टक्के, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/मनोज सकपाळ, पो.शि/अश्विन पाटील यांनी केली आहे.